# प्रेस नोट

दि. ११/०७/२०२६

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| फिर्यादी | **सरकार तर्फे श्री.अजित त्रिपुटे, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि. अहिल्यानगर** |
| गुन्हा नोंद क्रमांक | कर्जत पो.स्टे. गुरनं. ३५५/२०२६ दि. ११/०७/२०२६ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे, |
| आरोपीचे नांव व कार्यालय | **मिलिंद प्रल्हादराव राऊत वय—५० वर्ष धंदा नोकरी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कर्जत, जिल्हा अहिल्यानगर '(वर्ग २)'** |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १५,०००/ रू. तडजोडी अंती १०,०००/— रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, **यातील तक्रारदार हे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सचिव आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकी करिता सोसायटी ने मतदानाचा अधिकार कोणास द्यावयाचा याबाबत ठराव करून प्रस्ताव सहाय्यक निबंधक यांच्याकडे सादर करावयाचा असतो त्याकरिता सोसायटीचे सचिव तक्रारदार यांनी सर्व संचालकांची मीटिंग बोलावली होती. त्या संदर्भातली सर्वांना नोटीस अदा केली होती. परंतु एका संचालकास तो पुणे येथे वास्तव्यास असल्याने नोटीस अदा करता आली नव्हती. सर्व संचालक हे मीटिंग करिता हजर होते. त्यावेळेस ठराव पास करण्यात आला परंतु एका संचालकाने त्या ठरावावर सही केली नाही व सहायक निबंधक यांच्याकडे सदरचा ठराव हा बेकायदेशीर असल्याबाबत तक्रार केली होती. सहाय्यक निबंधक यांनी सदरची तक्रार निकाली काढली त्याचे मोबदल्यात तक्रारदार याच्याकडे पंचवीस हजाराची मागणी केली होती. त्यापैकी १०,००० रुपये आलोसे याने यापूर्वीच स्वीकारले होते व उर्वरित पंधरा हजार रुपयांची आलोसे तक्रारदार यांच्याकडे सतत मागणी करत होता अशी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे दिनांक ०९/०७/२०२६ रोजी प्राप्त झाली होती.**<br>**दिनांक १०/०७/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी वेळी तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक यांची भेट घेतली असता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे विरुद्धचे प्रकरण परस्पर मिटवल्याचे मोबदल्यात यापूर्वी १०,००० रुपये स्वीकारल्याचे मान्य करून आणखीन १५,०००/— रुपयांची मागणी करून तडजोडी अंती १०,०००/— रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्वत: स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.**<br>**दिनांक १०/०७/२०२६ रोजी आयोजित यशस्वी सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम १०,०००/— रूपये स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.** |
| सापळा कारवाई | १) सापळा अधिकारी :— पोलीस उप अधीक्षक श्री.अजित त्रिपुटे—मो.नं. ८३२९७०१३४४<br>(पर्यवेक्षण अधिकारी ला.प्र.वि. अहिल्यानगर )<br>२)पोहेकॉ/०५ संतोष शिंदे,३) पोकॉ/ वैभव सुपेकर<br>४) पोकॉ/२६६७ बाबासाहेब कराड, ५) चापोहेकॉ/२६ हारूण शेख |
| तपास अधिकारी | श्रीमती सविता तांबे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.अहिल्यानगर ९८३४८९१०१९ |

| | |
|---|---|
| मार्गदर्शन | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२)मा.श्री. प्रदिप मैराळे,अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.,नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३)श्रीमती. कविता फडतरे,अपर पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि.,नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

**संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर**

संकेतस्थळ :— acb.maharashtra.gov.in
ई—मेल :—१.spacbnashik@mahapolice.gov.in, 2.dyspacba.nagar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— **१०६४**
दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

**संपर्क क्रमांक:—**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर—टोल फ्री क्र:—** 1064 **व्हॉटस अप क्रमांक:— ९१६८६४१०६४**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक — टोल फ्री क्र:—** 1064 **वॉट्स अप क्रमांक ९५४५६५१०६४**
**लाचलुचपत प्रतिंबंधक विभाग,जळगाव — टोल फ्री क्र:—** 1064 **वॉट्स अप क्रमांक ७५८८६६१०६४**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे — टोल फ्री क्र:—** 1064 **वॉट्स अप क्रमांक ७७९८१६१०६४**
**लाचलुचपत प्रतिबंध विभाग,नंदुरबार — टोल फ्री क्र:—** 1064 **वॉट्स अप क्रमांक ९४२३५४१०६४**